<u>छत्रपती शाहू महाराज संशोधन,प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे</u>

*<u>प्रायोजित</u>*

**सारथी शेतकरी मावळा कृषि कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत**

**कृत्रिम रेतन व मुरघास निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रम**

---

**१. योजना :** सारथी शेतकरी मावळा कृषि कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत कृत्रिम रेतन व मुरघास निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रम

**२. प्रशिक्षण :** राज्यातील शेतकरी कृत्रिम रेतन व मुरघास निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रम

**३. प्रशिक्षण कालावधी व क्षमता :** अ) कृत्रिम रेतन ३० दिवसीय निवासी प्रशिक्षण व ६० दिवसीय कार्यानुभव प्रशिक्षण - २४ प्रशिक्षणार्थी/ बॅच
ब) १ दिवसीय मुरघास निर्मिती प्रशिक्षण-३० प्रशिक्षाणार्थी प्रति तालुका

**४. प्रशिक्षण ठिकाण :** १. एक दिवसीय प्रशिक्षणासाठी तालुक्यातील प्रमुख ठिकाण
२. ३० दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी पुणे, पेठ - नाशिक,
३. ६० दिवसीय कार्यानुभव प्रशिक्षणासाठी तालुक्यातील प्रमुख ठिकाण

**५. प्रशिक्षण शुल्क :** विनामूल्य (सारथी पुणे प्रायोजित)

**६. सारथी प्रायोजकत्व (स्पॉन्सरशीप)** - प्रशिक्षणार्थी शुल्क प्रशिक्षणार्थीचे वतीने सारथी संस्थेद्वारा प्रशिक्षण केंद्रास अदा करण्यात येते. ६० दिवसीय कार्यानुभव अनिवासी प्रशिक्षणार्थीसाठी मासिक शिष्यवृत्ती प्रशिक्षाणार्थीचे खात्यावर वर्ग केली जाईल.

**७. वय :** किमान १८ ते ५० वर्षे

**८. लाभार्थी पात्रता :**

i) अर्जदार हा महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या प्रवर्गातील असावा.
ii) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाखापेक्षा जास्त नसावे.
iii) प्रशिक्षणाकरिता अर्जदार हा किमान दहावी पास असावा.
iv) सारथी, पुणे मार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांचा या अगोदर लाभ घेतलेला नसावा.

**९. आवश्यक कागदपत्रे :**

i) जातीचा दाखला ( कुणबी -मराठा,मराठा-कुणबी व कुणबी करिता)
शाळा सोडल्याचा दाखला अथवा जातीचा दाखला(मराठा जाती करिता)
ii) नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र/ EWS प्रमाणपत्र / तहसिलदार यांचा मागील वर्षांचे वार्षिक उत्पन्न रुपये ८.०० लाख रुपयांपेक्षा जास्त नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Income Certificate)
iii) आधार कार्ड ,हमीपत्र, २ पासपोर्ट आकाराचे रंगीत फोटो ,कोड ऑफ कंडक्ट बाबत हमी पत्र
iv) जन्म दाखला अथवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास दाखला(डोमिसाईल)
v) बँक अकाउंट तपशील

**१०. अपात्रतेचे निकष :**

i) कागदपत्रे अपूर्ण असणे व विहित मुदतीत सादर न करणे .
ii) ऑनलाइन अर्ज भरताना खोटी किंवा चुकीची किंवा अपूर्ण माहिती भरणे.
iii) हमीपत्रातील नियमांचे उल्लंघन केल्यास निवड प्रक्रिया, आर्थिक सहाय्याचे स्वरूप निश्चित करण्याचा अंतिम अधिकार हा मा.व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे यांच्याकडे राहील .
iv) विहित नमुन्यातील ऑनलाइन अर्ज www.sarthi-maharashtragov.in लिंकवर उपलब्ध आहे.